# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेल:pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ : साफुपुवि/निववि/८८७

दिनांक : ११/११/२०२४

१) मा. प्राचार्य/मा. संचालक
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था

२) मा. विभाग प्रमुख
विद्यापीठ शैक्षणिक विभाग,
प्रस्तुत विद्यापीठ

विषय : विद्यापीठाचा वार्षिक अहवाल २०२३—२४ साठी ऑनलाईन पध्दतीने माहिती सादर करणेबाबतचे यापूर्वीचे / सा.फु.पु.वि./निववि/७२८ दि. ३१/०७/२०२४ चे परिपत्रक

महोदय/महोदया,

वरिल संदर्भीय परिपत्रकानुसार विद्यापीठाच्या शैक्षकणिक वर्ष २०२३—२४ साठीचा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी Online पध्दतीने माहिती भरण्यासंदर्भात कळविण्यात आलेले होते. त्यानुसार बहुतांश महाविद्यालयांनी माहिती भरलेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३—२४ च्या वार्षिक अहवालाचा मसुदा तयार करण्यासाठी गठीत समितीची सभा दि. ०८/११/२०२४ रोजी पार पडली यामध्ये चर्चा होऊन सदर माहितीमध्ये काही बाबी नव्याने समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला असून ज्या महाविद्यालयांनी माहिती सादर केलेली आहे त्यांनी अधिकची माहिती पाठविण्याची व्यवस्था करावी तसेच ज्या महाविद्यालयांनी अद्यापही वार्षिक अहवालाची माहिती Online पध्दतीने सादर केलेली नाही त्यांनी नवीन मुद्यासह माहिती दि. १६/११/२०२४ पर्यंत Online पध्दतीनेच सादर करण्यात यावी, **माहितीची छापील प्रत (Hard Copy) नियोजन व विकास विभागास सादर करण्याची आवश्यकता नाही.**

विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२३—२४ च्या वार्षिक अहवालासाठी ऑनलाईन पध्दतीने माहिती सादर करण्याची लिंक खालील प्रमाणे आहे.

**www.unipune.ac.in – Home page - BOD Online – Login Page - Login with you Credentials – Dashboard -- Annual Report**

आपणांस विनंती की, विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२३—२४ च्या वार्षिक अहवालासाठी माहिती विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने सादर करून विद्यापीठास सहकार्य करावे. सदर माहितीची पूर्तता विहित मुदतीत न झाल्यास शासनाकडून व विद्यापीठाकडून विविध योजनेअंतर्गत मिळणारे अनुदान, सोयी/सवलती व इतर लाभ प्रलंबित राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच या कालावधीनंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

(श्री. सतिश पो. गडदरे)
सहायक कुलसचिव

प्रत — माहितीसाठी :

१. मा. प्र-कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ.